Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# समकालीन मराठी ग्रामीण कथा साहित्यातील विषमतेचे चित्रण

डॉ.गवराम नाना पोटे
मराठी विभागप्रमुख
काकासाहेब चव्हाण कॉलेज, तळमावले,
ता.पाटण, जि.सातारा
E-mail: gawarampote@gmail.com
MB.9881621884

**समकालीन संज्ञा स्पष्टीकरण:** 'गतीमानता' हे मानवी जीवनाचे लक्षण आहे. परिवर्तन ही अव्याहत चालणारी प्रक्रिया आहे? काळाशी निगडीत असलेल्या 'समकालीन' संज्ञेचा परिवर्तनाशी निकटचा संबंध आहे. समकालीन हा शब्द उघडपणेच काळाचा निर्देश करणारा आहे? प्रत्येक मानवी कृतीला 'अवकाश' व 'काळ' ही परिमाणे असतात. प्रत्येक काळातील परिस्थिती व आव्हाने वेगवेगळी असतात. डिक्शनरीमध्ये समकालीन म्हणजे एकाचवेळी अस्तित्वात असलेले, घडत असलेले एकाच युगातले, एकाच तारखेचे, जगत असलेले, एकाच काळाशी निगडीत असणाऱ्या व्यक्ती, एकाच युगातील व्यक्ती असे ढोबळ अर्थ दिले आहेत. मी व माझे समकालीन हा सर्वात सोपा व वरवरचा अर्थ. ज्येष्ठ लेखक वसंत आबाजी डहाके यांच्या मते, ''खूप परस्परविरोधी विचारांचा पुंज म्हणजे समकालीन— समकालीन साहित्य म्हणजे जे आपल्या काळाबरोबर आहे, ज्या काळात ते निर्माण होत असते त्या काळाचे प्रतिबिंब त्यात आहे. त्या काळातील विचार, जाणिवा, मते ज्या साहित्यातून व्यक्त होतात असे साहित्य.'' म्हणजेच विशिष्ट काळातील समस्या, ताण, अंतर्विरोध असे चित्रण साहित्यात येते. साहित्यिक हा समाजाचा घटक असल्याने समाजातील बदलते संदर्भ साहित्याचा विषय होतो. साहित्याचा अनुबंध जगण्याशी, परिसराशी, कला व्यवहाराशी, सांस्कृतिकतेशी असतो. साहित्य हे समाजाचे जीवनसत्व असते. जे लेखक मानवाच्या शोधात असतात, ते सार्वकालिक असतात.

समकालीन शब्दात फारसा काटेकोरपणा नाही. ''बेले फिरसे हरे होने लगते है, वैसेही समकालीनता का गुणधर्म है।'' आधीच्या साहित्यामध्येही समकालातील बीजे असू शकतात. उदा. गतकालातील पौराणिक कथेच्या आधाराने 'ययाती' (कादंबरी) सारखी सर्वोत्तम ललितकृती लिहून वि.स.खांडेकर समकालीन बनवतात. ''इतर क्षेत्राप्रमाणे कालाबरोबर वाङ्मय हे इतिहासरूप म्हणजे कालगत होते, हे खरे आहे. पण वाङ्मयाचे वेगळेपण असे की, कालाच्या ओघाबरोबर इतिहासजमा झालेल्या वाङ्मयापैकी काही भाग हा सार्वकालिक महत्वाचा ठरतो, तो कालपक्व असा कधीच होत नाही. त्यालाच अक्षर वाङ्मय म्हटले जाते. असे वाङ्मय जितक्या आस्थेने त्याच्या निर्मितीकालात वाचले जाते तेवढयाच आपलेपणाने ते नंतरही वाचले जाते. म्हणजे ते सदैव समकालीन महत्वाचे राहते.[१] वाङ्मयीन कलाकृतींना त्यांच्या गुणांमुळे अक्षरत्व प्राप्त होत असते. व्यक्तिगत आशा—आकांक्षा, भावना जरी कलाकृतीतून व्यक्त होत असल्या तरी लेखनकृती या लेखकाच्या कालाबरोबर चालत आलेल्या वाङ्मयीन परंपरेशी संबद्ध असतात.

**जागतिकीकरणाचा ग्रामीण समाज जीवनावरील प्रभाव** : ग्रामीण भागात शेतीवर अवलंबून असणाऱ्या प्रत्येक कुटुंबाला आर्थिक, सामाजिक संकटांना तोंड द्यावे लागत आहे. १९९० नंतर जागतिकीकरणामुळे देशाचे

अर्थकारण, राजकारण, समाज, संस्कृती, साहित्य आदी बाबींमध्ये अंतर्बाहय परिवर्तन घडून आले. बदल हा जीवनाचा तसेच जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राचा अविभाज्य भाग आहे. तेव्हा त्या बदलाचे साद–प्रतिसाद प्रत्येक क्षेत्रात उमटतात. सध्याचं जग गतिमान झालं आहे. जागतिकीकरणामुळे पारंपरिक जीवनशैली झपाटयाने बदलली तसेच सांस्कृतिक नीतीमूल्यांची पडझड झाली. कुटंबव्यवस्थेवर आघात झाला. जागतिकीकरणाचा चेहरा विक्राळ आहे. माणूस हा या जगात एक ग्राहक बनला आहे. देशातील गरीब–श्रीमंत ही विषमतेची दरी वाढली आहे. शहरी भागाच्या झगमागाटामुळे ग्रामीण शेतकरी गुंठा गुंठा जमीन विकून देशोधडीला लागत आहे. आर्थिकदृष्टया नव्हे तर सांस्कृतिक आणि सामाजिक दृष्टीनेही हा वर्ग तथाकथित उच्चवर्गीय समाजापासून तोडला गेलेला आहे. महानगरे कूस बदलत आहेत. इथल्या श्रमजीवी समाजाच्या हातून वाळू सुटत जावी तसे हे महानगर निसटून चालले आहे. आधीच्या श्रमजीवी समूहाला महानगरातून अपरिहार्यपणे हद्दपार होण्याची वेळ आली.

गत तीन दशकात महाराष्ट्राच्या राजकारणात, समाजकारणात, सांस्कृतिक जडणघडणीत अनेक स्थित्यंतरे आली. ग्रामीण भागामध्ये सततची नापिकी, कर्जबाजारीपणा, शेतमालाला न मिळणारा भाव यासह विविध कारणांमुळे बळीराजा आत्महत्येसारखा टोकाचा मार्ग अवलंबू लागला. गत दोन तीन दशकांपासून विदर्भ–मराठवाडयातील शेतकरी विविध संकटाच्या मालिकेत अडकला आहे. आधुनिक बाजारव्यवस्थेने गावगाडयाला छेद दिला आहे. गरिबी, दारिद्रय यांमुळे ग्रामीण व शहरी भागांतील आर्थिक दरी वाढतच चालली आहे. समकालीन मराठी ग्रामीण कथा जागतिकीकरणाच्या रेटयात उद्ध्वस्त होत चाललेल्या खेडयाचे यथार्थ दर्शन घडविते. या संदर्भात ज्येष्ठ साहित्यिक डॉ.द.ता.भोसले यांचा अभिप्राय उल्लेखनीय आहे. त्यांच्या मते, ‘‘१९८० नंतरच्या काळात या साहित्यप्रवाहात एक लक्षणीय बदल घडलेला दिसतो तो म्हणजे तळागाळातला तरूण मोठया आत्मविश्वासाने लिहू लागला. या तरूणाची नाळ सद्य:स्थितीशी आणि आजच्या ग्रामीण जनजीवनाशी अजूनही पक्की बांधलेली आहे. तो स्वत:ही खेडयात जगतो. स्वत:ची शेती कसतो. त्यामुळे अवती–भवतीचे बदलते वास्तव त्याच्या चिंतनाचा व लेखनाचा विषय झाले नाही तरच नवल! हा तरूण लेखकवर्ग नागर वाचकांच्या मनोरंजनाचा विचार न करता किंवा त्यांच्या अभिरूचीला शरण न जाता अतिशय गांभीर्याने लेखन करतो आहे.’’[२]

ग्रामीण कथाकारांनी सामाजिक आणि समकालीन कथाविषय निवड करून मौलिक कथानिर्मिती केली. भास्कर चंदनशिव, व.बा.बोधे, शंकर खंडू पाटील, गणेश आवटे, आप्पासाहेब खोत, अनुराधा गुरव, राजन गवस, सदानंद देशमुख, राजन खान, किरण गुरव, अर्जुन व्हटकर, आसाराम लोमटे, रा.रं.बोराडे, नागनाथ कोत्तापल्ले आदींनी ग्रामजीवनाचा संपूर्ण पट मांडून कौटुंबिक आणि सामाजिक जीवनाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला आहे. प्रस्तुत शोध निबंधामध्ये प्रातिनिधीक कथाकारांच्या कथांच्या आधारे ‘मराठी ग्रामीण कथा साहित्यातील विषमतेचे चित्रण’ या विषयाचा उहापोह करण्याचा प्रयत्न केला आहे.

गेल्या तीन दशकातील मराठी ग्रामीण कथा ही काळप्रवाहाचे स्पंदन आहे. बदलत्या समाजजीवनातील नानाविध हुंकार ग्रामीण कथावाङ्मयातून उमटले आहेत. वस्तुत: १९९० नंतरच्या बहुतांश ग्रामीण कथेला राजकीय, सामाजिक जाणिवांचा व्यापक संदर्भ आहे. समकालीन कथेचा अवकाश वेगाने बदलत चाललेल्या भोवतालचा, भौतिक जीवनाचा वेध घेताना दिसत आहे.

**सामाजिक, सांस्कृतिक विषमतेचे चित्रण:** समाजात अलीकडच्या काळात कमालीची आर्थिक, राजकीय, सामाजिक अस्थिरता व विषमता निर्माण होत आहे. विज्ञान तंत्रज्ञानातील क्रांती व जागतिकीकरणाचा प्रचंड प्रभाव आजच्या समाजजीवनावर झालेला आहे. समाजरचना बदलत आहेत. लोकांचे जीवनमान बदलत आहे. ज्यांनी २०—२५ वर्षापूर्वीचा गाव बघितला असेल, ज्यांचे लहानपण खेडेगावात गेले असेल, त्याचे आतडे सोलवटून निघते. कारण गावातील एकोपा, सुबत्ता, शांतपणा, संस्कार याबाबी अस्ताला गेल्या आहेत. खेडेगावातील सामाजिक वीण घट्ट असते. आजकाल कुठेही नजर फिरवा, आर्थिक समृद्धीबरोबरच सामाजिक/सांस्कृतिक कंगालपणाच्या खुणाही पटकन नजरेत भरतात. या बदलाचा मागोवा घेत ग्रामीण कथाकार सामाजिक जाणिवेची भाषा बोलू लागले. आत्यंतिक तळमळीतून कथालेखन केलेलं आहे. भारतात वर्णव्यवस्था व जातीव्यवस्था वेगवेगळया स्तरांत जशीच्या तशीच घट्ट आहे. या सगळया प्रश्नांचा आणि बदललेल्या जाणिवांचा सूक्ष्मतेने शोध घेण्याचा प्रयत्न ग्रामीण कथालेखकांचा आहे. शेतकऱ्याचे दु:ख, दैन्य, शोषण आणि अत्याचार प्रकट करणारी ग्रामीण कथा खेडयातील दाहक दु:खाची साक्ष आहे. समाजजीवनातील स्थित्यंतराचे प्रामाणिकपणे कलात्मक रूप कथाकारांनी चित्रित केले. ग्रामीण जीवनातील निर्माण झालेले नवे, ज्वलंत प्रश्न कथाकारांनी व्यक्त केले आहेत.

भास्कर चंदनशिव यांनी शेतकऱ्यांच्या कष्टाधिष्ठित, वेदना, विद्रोहाचा संदर्भ देणारी वास्तवदर्शी कथा लिहिली. अल्पभूधारक ऊस उत्पादक शेतकरी व ऊसतोड मजूर यांना मुकादमाकडून होणारी अडवणुकीचे चित्रण 'तोडणी' कथेत येते. 'इस्कुटा', 'कोळसं', 'होळी' आदी कथांमधून शोषित, पीडित शेतकऱ्यांची कहाणी येते. दलितांच्या स्त्रिया अत्याचाराला बळी पडतात हे कटू सत्य 'वासना', 'पोटांधळ' कथेमधून मांडतात. किरण गुरव गेल्या दशकातील विविध प्रश्नांना, गतीला, आजाराला भिडणारी कथा लिहितात. त्यांच्या 'नभ उतरू आलं', 'गवर', 'राखीव सावल्यांचा खेळ', 'काळी कपिला गाय', 'बलबीरचा पाश', 'भिंगातून वर्तमान पाहणारा माणूस' आदी कथांमधील सामाजिक, सांस्कृतिक आशय लक्षणीय स्वरूपाचा आहे. श्रीलिपी कथासंग्रहातील 'वडाप', 'क्लॉक अवर बेसिस', 'शायनर', 'डिजिटल मृगजळाचा प्रवास' आदी कथांमधून समकालीन परिस्थितीने पिचलेली, अन्यायग्रस्त व्यक्तिरेखांचे दर्शन घडते. समाजरचनेबरोबर जीवनमान, सांस्कृतिक मूल्यं बदलत आहेत, याचे दर्शन किरण गुरव यांच्या कथेत प्रभावीपणे येते. 'गवर' कथेतील भारती, 'भिंगातून वर्तमान पाहणारा माणूस' मधील गोंद्या बामन, 'श्रीलिपी' कथेतील पाटोळे सर या व्यक्तिरेखा स्थितप्रज्ञेकडे झुकलेल्या आहेत.

डॉ. राजन गवस यांची कथा गावगाडयाचे वर्तमान नेमकेपणाने चित्रित करते. 'रिवणावायली मुंगी' आणि 'आपण माणसात जमा नाही' या कथासंग्रहातील कथांमधून विविध प्रश्न हाताळले आहेत. 'रिवणावायली मुंगी' या कथेमधून सुशिक्षित तरूणीची व्यथा अभिव्यक्त केली आहे. स्त्रीचा प्रश्न तिच्या दु:खाचा, वेदनेचा, अत्याचारांचा जसा आहे तसा मानवी स्वातंत्र्याचाही आहे. त्यांच्या 'बाई', 'घुसमट', 'हुंदका', 'तळ' आदी कथांमधून नियतीशी संघर्ष करणाऱ्या नायिका भेटतात. 'एक होता कावळा', 'उचकी', 'तिच्या बापाची गोष्ट', 'अंधारवड', 'हुंदका', 'पाझर', 'तुटल्या प्रदेशाचा प्रवास', 'बहुलकरांच्या मुलाची गोष्ट', 'सन्नाटा', 'छळणारी गोष्ट', 'घव' आदी कथांमधून ग्रामीण माणसाच्या जाणीवा समर्थपणे प्रगट होतात. ग्रामीण समाजजीवनात सांस्कृतिक जीवनाला एक विशिष्ट स्थान असते. जगण्याच्या आणि

माणुसकीच्या ओलाव्याच्या असीम धाग्याने इथला माणूस तगून राहतो. आपापसातील हेवेदावे, स्वार्थ, व्यवहार, नातीगोती यांच्या विविध छटांचे प्रतिबिंब राजन गवस यांच्या कथांमध्ये दिसते.

सध्याच्या अस्वस्थ वर्तमानाचा वेध घेणारा लेखक म्हणून लक्ष्मीकांत देशमुख यांची कथाही वैशिष्टयपूर्ण आहे. त्यांचे 'पाणी! पाणी!!' आणि 'गाव विकणे आहे' हे कथासंग्रह उल्लेखनीय आहेत. वर्तमानकालीन परिस्थितीच्या संदर्भात त्यांनी केलेले भाष्य विचारसन्मुख करणारे आहे. परिस्थितीपुढे गुडघे टेकून नैराश्याच्या गर्तेत सापडलेला शेतकरी 'गाव विकणे आहे' कथेत भेटतो. 'पाणी–चोर', 'लढवय्या', 'बांधा', 'खडकात पाणी', 'हमी? कसली हमी?', 'मृगजळ' आदी कथांमधून समकालीन जाणिवा दमदारपणे व्यक्त केल्या आहेत. देशमुखांना शेतीमातीतील माणसांच्या व्यथा–वेदनांची, आदिवासी समाजातील स्थित्यंतराची, असंवेदनशील प्रशासनव्यवस्थेची चांगली जाण आहे. लेखन आणि प्रशासन हे त्यांच्या जीवनाचे अविभाज्य भाग आहेत.

सदानंद देशमुख यांच्या 'महालूट', 'अंधारबन', 'लचांड', 'रगडा', 'खुंदळघास' इ. कथासंग्रहामधून बदलत्या गावगाडयाचं आणि दयनीय शेतकऱ्याचं चित्रण येते. बदलत्या समाजजीवनाच्या प्रवाहात ग्रामसंस्कृती लोप पावत चाललेली आहे. भुकेल्यासाठी आपल्या पानातील एक घास राखून ठेवण्याची वृत्ती वेगाने आकुंचन पावते आहे. आज समाज फार आत्मकेंद्रित झाला आहे. आर्थिक समृद्धीइतकीच सामाजिक, सांस्कृतिक समद्धीचीही समाजाला गरज असते. ही समृद्धी वाढविण्याचा प्रयत्न ग्रामीण कथाकार करताना दिसतात.

**आर्थिक विषमतेचे चित्रण:** आज नैसर्गिक आपत्तीने शेतकरी, कष्टकरी माणूस पार उध्वस्त झाला आहे. शेतकरी, कष्टकरी हालाखीचे जीवन जगतो. समकालीन ग्रामीण कथाकारांनी शेतकऱ्यांच्या दु:खावर आणि त्यांच्या होरपळणाऱ्या जगण्यावर विदारक प्रकाश टाकाला आहे. शेतकरी आयुष्यभर संघर्ष करीत असतो. शेतकऱ्यांचे प्रश्न माणुसकीचे आहेत, जगण्याचे प्रश्न आहेत. जागतिकीकरणाच्या रेटयात शासनाचे शेतकरी वर्गाकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले. त्यामुळे शेतकऱ्याच्या मनात धुमसणारा असंतोष कथाकारांनी यथार्थपणे साकारला आहे. ग्रामीण जीवन शहरी मध्यमवर्गीयांपेक्षा अधिक कष्टमय, दु:खभोगी व अनेकपरीने अभावग्रस्त असे आहे. आर्थिक विषमता, शोषण, स्त्रियांची दु:खे, सामाजिक समस्या, आदी बाबींचे भेदक चित्र कथांमधून उभं राहतं. अर्जुन व्हटकर यांच्या 'तुंबण' आणि 'कावळयांची सुगी' या कथासंग्रहामधून जागतिकीकरणाच्या दाहक वास्तवात होरपळणाऱ्या शेतकऱ्यांचे, दलितांवरील अन्याय अत्याचारांचे जिवंत पडसाद उमटले आहेत. आज घडीला शेतकऱ्याला दिशाहीन जगायला लावणारी परिस्थिती सभोवताली आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तात्पुरती मलमपट्टी करण्यावरच शासन आपली इतिकर्तव्यता मानते. त्यामुळे विदर्भातील शेतकरी दुष्काळ, दारिद्रय, नापिकी, सावकारी कर्ज, गारपीट आदी संकटांना वैतागून आत्महत्या करत आहेत. या प्रश्नावर व्हटकरांनी 'कावळयांची सुगी' या कथेमधून तिरकस पण भेदक प्रकाश टाकला आहे. कथा वाचून वाचक अस्वस्थ, अंतर्मुख होतो.

डॉ.आसाराम लोमटे यांचे 'इडा पिडा टळो' (२००६) आणि 'आलोक' (२०१०) या कथासंग्रहापैकी 'आलोक' कथासंग्रहाला २०१६ मध्ये साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. त्यांच्या कथालेखनाविषयी डॉ. सुधीर रसाळ लिहितात, ''आसाराम लोमटे हे बिनीचे कथाकार. आजच्या ग्रामीण वास्तवाचे अतिशय तथातथ्य आणि प्रामाणिक चिंतन करणारी त्यांची कथा मराठी कथावाङ्मयाला नवे वैभव मिळवून देणारी

आहे.''[३] शेतकऱ्यांचे जीवन सरकार आणि निसर्गाच्या भरवशावर चालते असे म्हणतात. उत्पन्न अधिक झाले तरी शेतकऱ्याला फटका आणि कमी झाले तरी त्यालाच झळ. लोमटे यांच्या 'ओझं' कथेमधील मुरलीधर दुष्काळाच्या दुष्टचक्रात अडकून दारूच्या व्यसनात गुरफटतो आणि 'गाडी ओढणाऱ्या बैलानं शिवळा जोत्यातून मान काढून निघून जावं' तसा कीटकनाशक पिऊन जगाचा निरोप घेतो. अत्यंत समृद्ध आणि सशक्त कथालेखन करणारे भास्कर चंदनशिव यांना बदलत्या ग्रामीण जीवनाचे वास्तवाचे सजग भान आहे. दरिद्री, दु:खी जीवनातील व्यथा–वेदनांची चांगली जाण आहे. शेतकरी आणि शेतीवर राबणारा श्रमजीवी वर्ग हा दरिद्रीच असतो. भास्कर चंदनशिव यांच्या 'मेखमारो' कथेत दुष्काळामुळे शासनाविरोधात आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांचे चित्रण येते. 'कळा', 'बलामत' या कथांमध्ये दुष्काळाचे भीषण चित्र रेखाटले आहे. जागतिकीकरणाच्या रेटयात शेतकऱ्याचा बळी गेला. माणसांपेक्षा पैसा मोठा झाला. मातीमोल किंमतीने टोमॅटो विकावे लागल्यामुळे भ्रमचित्त झालेल्या शेतकऱ्याचे चित्रण करणारी 'लालचिखल' कथा वाचकाला अस्वस्थ करून सोडते. शेतीवर अवलंबून असणाऱ्या प्रत्येक कुटुंबाला आर्थिक संकटाला तोंड द्यावे लागत आहे. आर्थिक विषमतेमुळे गरिबांना शिक्षण, आरोग्य, नोकरी, व्यवसाय यांच्या म्हणजे उन्नती साधण्याच्या संधी नाकारल्या जातात.

**राजकीय विषमता:** आपल्या देशात वर्णव्यवस्था व पर्यायाने जातीव्यवस्था वेगवेगळया स्तरात खोलवर रूतून बसली आहे. अजूनही समाज पुराणकाळातील जातीपातींतून बाहेर पडण्यास तयार नाही. जात हा प्रकार पूर्वी सामाजिक आधार म्हणून वापरला जायचा. आता ती केवळ विषवल्ली होऊन उरलेली दिसते आहे. भास्कर चंदनशिव यांच्या 'मला काय त्येचं?' या कथेत बापूसाहेब देसाईच्या कुटील राजकारणामुळे दलितानां कसे वेठीस धरले जाते याचे चित्रण येते. 'लाल अंधार', 'होळी', या कथांमध्येही धूर्त राजकारणी व भ्रष्ट नोकरशाहीचे वर्णन येते. त्यांच्या 'विळखा' या कथेत गढूळ राजकारणाचे चित्र आले आहे. राजन गवस यांच्या 'ठराव', 'नवाचं तीन चतुर्थांश' या कथांमधून राजकारणात चालणारे आपहार व मुजोर, निर्लज्ज, निर्ढावलेले राजकारणी अभिव्यक्त केले आहेत. आसाराम लोमटे यांच्या 'बेईमान' कथेमधून सरपंचपदावर असणाऱ्या भगीरथच्या ससेहोलपटीचे चित्रण येते. 'जिनगानीचा जाळ', 'निचरा', 'चरक', 'इडा पिडा टळो', 'होरपळ', 'खुंदळण', 'जीत' आदी कथांमधून ग्रामीण भागातील राजकारणाचे सखोल व वास्तव चित्रण येते. अर्जुन व्हटकर यांची 'बळी' ही कथा वाचून आजही प्रत्यक्ष व्यवहारात स्त्रियांच्या योगदानाचे अवमूल्यन केलं जातं याची जाणीव होते. जातिव्यवस्थेने दलितांना जर्जर केले. हजारो वर्षे अस्पृश्य म्हणून पशुपातळीवरचे जीवन बहाल केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले होते, ''जात ही केवळ कामांची विभागणी नसून कामकऱ्यांची विभागणी आहे.'' वंशपरंपरागत व्यवसाय हा जातीचा आत्मा आहे. लक्ष्मीकांत देशमुख यांच्या 'कंडम' कथेतील बायजा या अस्पृश्य समाजातील स्त्री व्यक्तीरेखेच्या यातना, दु:ख, आकस्मिक मृत्यू या घटनांनी वाचकाचे डोळे पाणवतात. 'मृगजळ' ही कथाही दलितांच्या वेदनांना उजागर करते. राजकारणातील पैसा, दहशत, गुंडगिरी, पोकळ घोषणा यामुळे पूर्वी धर्माधर्मात, जातीपातींत जे ऐक्य, सामंजस्य, जिव्हाळा, सहकार्यभावना होती त्याला तडे गेले. राजकारणात गटबाजी आणि भ्रष्टाचार बोकाळला. राजकारणाने आर्थिक आणि नैतिक भ्रष्टाचाराची परिसीमा गाठली आहे. रा.रं.बोराडे यांनी 'पोतेरा' कथेत निवडणुकीच्या धामधुमीत सापडलेल्या सूर्याजी बागडे या तरूणाची घालमेल व्यक्त केली आहे. पूर्वी राजकारण एका

वैचारिक उंचीवर होते. साधेपणाने जबाबदारीची जाणीव, संवेदना असणारी दूरदृष्टी राज्यकर्त्यांकडे होती आज या बाबींचा अभाव जाणवतो.

**समारोप:**

गावगाडा बदलाची प्रक्रिया निरंतर आहे. आधुनिक काळातील बाजारव्यवस्थेने गावगाडयाला छेद दिला आहे. गावगाडयामध्ये ग्रामीण कारागिराची उत्पादकता आणि आजच्या व्यवस्थेची गरज आणि जगण्याची गती यांची सांगड घालता येत नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे आज गावगाडा कोलमडून पडलाय. म.गांधीजींची भूमिका अशी होती की, 'शेवटचा मनुष्य जो आहे त्याच्याकडे लक्ष द्या'. लेखक हा लोकांचा आवाज असतो. तद्वतच ग्रामीण कथालेखकांनी शोषित, वंचित, उपेक्षित पात्रांना स्थान दिले. तंत्रज्ञानाच्या प्रगतीने जग जागतिक खेडे बनले असले तरी हजारो माणसांना जगवणारा गावगाडा मात्र फार वेगाने कोसळू लागला आहे. जातीच्या अस्मिता टोकदार बनत चालल्या आहेत. या पार्श्वभूमीवर ग्रामीण कथाकारांचे सामाजिक भान फार महत्वाचे आहे. अनेक अस्पर्शित विषयांवर कथालेखन केले. दु:खी समाजघटकांबद्दल आईच्या कळवळयाने कथाकार लिहितात. समकालीन जागतिकीकरणाच्या काळात दयनीय होत गेलेला शेतकरी, शेती आणि गावगाडा हा ग्रामीण कथाकारांच्या कथालेखनाचा केंद्रबिंदू आहे. माहिती तंत्रज्ञानामुळे जग लहान होत आहे, जवळ येत आहे. परंतु मनाने 'मी आणि माझे', जगणारी माणसे एकेकटी आहेत. माणसाची होणारी घालमेल कथांमधून समर्थपणे मांडली आहे. गावाची शक्ती क्षीण होत चालली आहे. त्यामुळे गावाचे गावपणे हरवून चालले आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्थेमुळे नीतिमूल्यांचा ऱ्हास होऊन नैतिकता ढासळली. बदलत्या ग्रामजीवनाची नस नेमकेपणानं पकडणारं कथालेखन कथाकार करतात. त्यामुळे क्षणभर का होईना वाचक विचारप्रवृत्त होतो.

**संदर्भ:**

१. डॉ.संत दु.का., वाङ्मयीन विद्वत्ता, पुणे विद्यापीठ प्रकाशन, जुलै १९७६, प्रथम आवृत्ती, पृ.३४.
२. डॉ.भोसले द.ता., ग्रामीण साहित्य: एक चिंतन, मनोविकास प्रकाशन, पुणे, सप्टेंबर २००१, द्वितीय आवृत्ती, पृ.२१.
३. दै. लोकसत्ता (वर्तमानपत्र), दि.२२ डिसेंबर २०१६.